(इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद. )

१९९६-१-एससीआर -६९२

कर्नाटका लोकसेवा आयोग

वि .

पी.एस. रामकृष्ण

जानेवारी १७, १९९६

[न्या. के. रामास्वामी, न्या. बी. एल. हंसारिया आणि न्या. एस. बी. मजमुदार ]

सेवा कायदा :

न्यायाधिकरणाचा आदेश- सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेला कायदा लक्षात घेता आणि प्रकरण निर्णयाच्या अंतर्गत येत असल्याने रद्द केला.

कर्नाटका लोकसेवा आयोग आणि इतर वि. बी.एम. विजय शंकर आणि इतर, **[१९९२] २ एससीसी २०६, लागू आहे असे मानले.**

दिवाणी अपिल अधिकारिता : दिवाणी अपील क्रमांक २४१३/१९९६

अ. क्र. ६६१२ /१९९० मधील बेंगळुरू येथील कर्नाटका प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या १८.१२.९० च्या न्यायनिर्णय आणि आदेशावरून.

अपीलकर्त्यासाठी एम. वीरप्पा.

न्यायालयाने  पारित केलेला आदेश खालीलप्रमाणे आहे  :

उतरवादीला २८ सप्टेंबर १९९३ रोजी नोटीस पाठवण्यात आली असली, तरी ते "हजर नाही.  म्हणून  प्रेषकाकडे परत  पाठविण्यात आली” अशा  शेऱ्यांसह परत आले आहे.   म्हणून  हे उघड असेल की उतरवादी सेवा टाळत आहे. म्हणून, नोटीस उतरवादीवर बजावण्यात  आली आहे असे मानन्यात यावे.

अनुमति दिली.

या प्रकरणात निर्माण झालेला वाद हा या न्यायालयाच्या कर्नाटका लोकसेवा आयोग आणि इतर  वि. बी. एम. विजया शंकर आणि इतर [१९९२] २  एससीसी २०६ या प्रकरणात दिलेल्या निर्णयाच्या अंतर्गत येतो.

या निर्णयानंतर अपील मंजूर केले जाते आणि न्यायाधिकरणाचा आदेश रद्द केला जातो, परंतु खर्चाशिवाय.

जी.एन.                                                                                             अपील मंजूर.

**x-x-x-x**

# अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्याय निर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

**x-x-x-x**